**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 8 | April 2015**

**ISSN:- 2393-8900**

**Research Article**

# *भारतातील स्वांतत्र्योत्तर शेतीव्यवस्था*

***व्ही. एच. निंबाळकर***

ए. आर. बुर्ला वरिष्ठ महाविद्यालय,सोलापूर

***सारांश :***

शेती हा मानवाचा प्राचीन व मूलभूत व्यवसाय आहे. जगातील बहुसंख्य लोकांचा हा प्रमुख व्यवसाय आहे. भूमी–उपयोजनात पृथ्वीच्या एकूण भौगोलिक क्षेत्राचा मोठा भाग शेतीखाली आहे या व्यवसायातून मानवाला विविधं प्रकारंची साधनसंपत्ती मिळते.

***प्रस्तावना :***

अन्न,वस्त्र,निवारा या मूलभूत गरजांपासून ते अनेक लहान मोठया वस्तूनिर्माण उदयोगधंदयात शेती उत्पादनांचा उपयोग होतो. अशा या महत्वपूर्ण व्यवसायासाठी मानवाने आपल्या बुध्दीकौशल्याचा उपयोग करून शेतीव्यवसायावर आपले प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न केला असला तरी नैसर्गिक पर्यावरण किंवा घटक हा या व्यवसायाचा एकमेव व प्रमुख आधार आहे. प्रस्तुत शोध लेखात स्वातंत्र्योत्तर शेतीव्यवस्थेचा आढावा घेतलेला आहे.

***2. संशोधनाचे उद्येशः–***

1) स्वातंत्र्योत्तर काळातील कृषी व्यवस्थेचे स्वरूप जाणून घेणे.
2) स्वातंत्र्योत्तर काळात कृषी व्यवस्थेमध्ये झालेल्या सुधारणांचा आढावा घेणे.
3) स्वातंत्र्योत्तर काळातील शेती व्यवस्थेमधील नवीन बदलांचा अभ्यास करणे.

***3 . कृशी सुधारणाः–***

भारताला स्वांतत्र्य मिळण्यापूर्वी भारतीय कृषीअर्थव्यवस्था ही जमीनदार,सावकार,शेतकऱ्यांचे शोषण करणारे यांच्या प्रभावाखाली होती. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर दलालांचे उच्चाटन,शेतकऱ्यांचा शेतीवर अधिकार व त्याला संरक्षण तथा शेती सुधारणा याला तत्काळ सुरूवात झाली नाही. जमीनदार वर्गाचा उदय वसाहतवादी शासनकाळात झाला. जास्तीत जास्त जमीन ही जमीनदारांच्या ताब्यात होती आणि हाच वर्ग इंग्रज सरकारला शेतसारा देत असे. हे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात शोषण करीत त्यामुळे शेतकऱ्यांनी याविरूध्द वारंवार उठाव करून आपली प्रतिक्रिया व्यक्त केली होती. परंतु जमीनदारांचे उच्चाटन करणे ही कठीण गोष्ट होती आणि त्यांच्या उच्चटनाशिवाय शेतकऱ्यांच्या स्थितीत सुधारणा होणे शक्य नव्हते. भारतातील डाव्या विचार सरणीचे लोक जमीनदार आणि शोषकांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणाबद्दल शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी या मताचे होते.

गांधीजीही आवश्यकतेपेक्षा जास्त जमीन बाळगण्याच्या विरूध्द होते. ते सहकारी शेतीचे पक्षपाती होते. भारताला स्वांतत्र्य मिळाल्यानंतर शासनाच्या भूमीसंबंधी धोरणाला या दोन्ही विचारधारांनी प्रभावित केले. इ.स. 1949 मध्ये कॉंग्रेसने 'कॉंग्रेस कृषी सुधारणा समिती' स्थापन केली. या समितीचा उद्देश जमीनदार आणि शेतकरऱ्यांचे शोषण करणाऱ्यांच्या अधिकारांना समाप्त करणे हा होता. या समितीने शेतकऱ्यांजवळ किमान व कमाल जमीन किती असावी ते आपल्या प्रस्तावात निर्धारित केले. सहकारी परिस्थितीला अनुसरून 15–20 एकर शेती हे आर्थिक प्रमाण निश्चित करण्यात आले. सहकारी तत्वावरील शेती ऐवजी व्यक्तीगतत किंवा कौंटूबिक अधिकार मान्य करण्यात आला. सामान्यतः संपूर्ण भारतात जमीनदारी प्रथा होती. रयतवारी पध्दती जमीनदारी प्रथेच्या विरूध्द होती. या पध्दतीत शेती

कसणारा आणि शेतकरी सरकारला शेतसारा देत असे. शेतसऱ्याचे प्रमाण बरेच जास्त असे शेतसारा आणि शेतात येणारे पीक यांचा संबंध नसल्याने शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची असे. धान्य साठा शिल्लक नसल्याने दुष्काळा अन्नाअभावी माणसे मरत, शेतकऱ्यांजवळ धान्य साठा शिल्लक नसणे हे दुष्काळाचे मुख्य कारण असे. भारतातील निष्णात कषीतज्ञ प्रो. राधाकमल मुखर्जी यांनी 1935 मध्ये असे विधान केले होते की, 'भारतीय शेतीव्यवस्थेत जोपर्यंत सुधारणा होत नाही तोपर्यंत सहकारी तत्वावर आधारित शेतीला सुरवात करू नये.' यासाठी पहिले पाउुल म्हणजे जमीनदारी प्रथेचा अंत करणे हे होते. भारतात 1950 मध्ये योजना आयोग स्थापन झाला. याच वर्षी पंचवार्षिक योजना लागू करण्यात आली. योजना आयोग,केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांच्या हितासाठी अनेक कार्यक्रम घोषित केले. या संदर्भात उत्तर प्रदेश सरकारने 'जमीनदारी उच्चाटन कायदा' व इतर राज्यांनी 'मध्यस्थ उच्चाटन कायदा' करून शेतकऱ्यांना जमिनीचे मालक बनविले. शेतकऱ्यांनी सरकारकडे सरळ शेतसारा भरावा हे शेतकऱ्यांना बंधनकारक करण्यात आाले. वस्ती नसलेली भूमी, कुरणे, जंगल,तलाव इत्यांदीवरील जमीनदारांचा अधिकार समाप्त करून ती सर्व भूमी ग्रामपंचायतीच्या हाती सुपूर्द करण्यात आली. जमीनदारांचा जमिनीवरील अधिकार समाप्त करण्याच्या मोबदल्यात त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली. एका आकडेवारीनुसार ही रक्कम 670 कोटी रूपयांच्या घरात होती. या कायद्ययामुळे सुमारे दोन करोड शेतकऱ्यांना जमिनीची मालकी मिळाली. जमीनदारांच्या जाचातून त्यांची मुक्तता झाली. या कायद्याचा जमीनदारांना भरपूर लाभ झाला. सोडलेल्या जमिनीबद्दल त्यांना मोबदला मिळाला शिवाय नियमानुसार जितकी जमीन बाळगता येते तेवढया जमिनीचे ते प्रत्यक्ष मालक झाले. ते आता नवजमीनदार म्हणवून घेऊ शकत होते. जमीनदारांनी अधिक जमीन बाळगू नये म्हणून लॅण्ड सिलिंग ॲक्ट लागू करण्यात आला. इ.स. 1950 च्या दशकात हा कायदा सर्वच राज्यात लागू करण्यात आला. परंतु काही त्रुटीमुळे अतिरिक्त जमिनीचा लाभ अल्पभूधारक किंवा अनुसुचित जातींना पुरेसा मिळू शकत नाही. बहुतेक शेतकरी हे अल्पभूधारक होते. त्यामुळे एका भागातील सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन एकत्र करून तिचा एक मोठा भाग बनविण्यात आला. या व्यवस्थेत प्रत्येक भूधारकाला त्याच्या जमिनीचे मोजमाप,मूल्य आणि सुपीकतेच्या आधारावर जमिनीचा नवीन तुकडा प्रदान केला जाई. इ.स. 1957 पर्यत जवळजवळ 150 लाख एकर जमिनीची अशा प्रकारे विभागणी करण्यात आली होती. भारतीय कृषि व्यवस्थेत सिंचनाचे महत्व लक्षात घेऊन या योजनेच्या निर्मात्यांनी संचनाच्या साधनांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले. पहिल्या आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनांत सिंचन आणि विद्युत याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरूवातीच्या वेळी इ.स.1950–51 मध्ये सिंचनाखालील एकूण जमीन 2.08 करोड हेक्टर होती. इ.स. 1965–66 च्या सुमारास हे क्षेत्र वाढून ते 3.64 करोड हेक्टर झाले. या योजनेमूळेच भारत आज अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण आहे. याषिवाय वीजनिर्मिती, मत्स्यपालन, पूर–नियंत्रण इत्यादी उद्देश डोळयांपुढे ठेवून नद्यांच्या संदर्भात विविध योजना बांध,धरणे,विद्युतनिर्मिती सुरू करण्यात आल्या. भारतीय शेतीच्या विकासासाठी रासायनिक खतनिर्मती प्रकल्प हाती घेण्यात आला. यासाठी फर्टिलायझर कार्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडची स्थापना करण्यात आली. हे प्रकल्प सिंद्री(बिहार),ट्रॉम्बे (महाराष्ट्र),गोरखपूर (उत्तर प्रदेश), भाक्रानागल(पंजाब), दुर्गापूर(पश्चिम बंगाल),बरौनी (बिहार) इत्यादी आहेत.

ग्रामीण भागात जे शेतीचे स्त्रोत होते. त्यांचे रक्षण करण्यासाठी ग्रामपंचायतीची स्थापना करण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर या संस्थाचा मानसिक प्रभाव पडला. ग्रामीण भागातील मध्यस्थ वर्गाचे निर्मूलन झाले आणि ग्रामपंचायतीत निवडून आलेले प्रतिनिधी खेडयांच्या विकासप्रक्रियेत सहभागी झाले. शेती सुधारणेमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणात बदल घडून आला. सुरूवातीला देशात अन्नधन्याची कमतरता होती ती 70–80 च्या दशकात दूर होऊन देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. शेतीसुधारणा,पाणी पुरवठयात प्रगती, रासायनिक खतांची उपलब्धता यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत क्रांतीकारक परिवर्तन घडून आले. ग्रामीण भागात सामाजिक आणि राजकीय जागृती हाउुन लोकांना लोकशाही मूल्यांची जाणीव झाली. हरितक्रांती आणि शेतीसुधारणा योजनांमुळे मोठया शेतकऱ्यांचा अधिक फायदा झाला.

### *4 निष्कर्ष:–*

भारत हा कृषीप्रधान देश असल्याने बहुसंख्य जनतेच्या विकासासाठी सरकारने स्वातंत्र्योत्तर भारतात प्रगती घडवून आणुन उत्पादन वाढविण्याचा प्रयत्नाला प्रथम प्राधान्यक्रम दिले. शेतीच्या विकासासाठी महामंडळाची स्थापना शासनाने केली. शेतीमालाच्या खरेदी, आयात, साठवणूक, वितरण इत्यादी बाबीकडे विशेष लक्ष दिल्याने शेती व्यवसायात प्रगती घडवून आली. कृषी विदयापीठाची स्थापना करून या विषयाला अभ्यासक्रमात विस्तृत स्वरूप प्राप्त करून दिले. ग्रामपंचायतीच्या हाती कृषीविषयक अधिकार दिल्याने कायदयाचे पाठबळ मिळून शेतकऱ्यांना न्याय मिळाला. कृषीअर्थव्यवस्थेत सिंचनाचे महत्व लक्षात घेऊन पंचवार्षिक योजनेत सिचंनाला महत्व दिले गेले. या गोष्टीमुळे शेती सुधारणा,पाणी पुरवठयात प्रगती, रासायनिक खतांची उपलब्धता यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत क्रांतीकारी परिवर्तन घडून आले.

आजदेखील शेतीव्यवसायात सरकारचे शेती विषयक धोरण महत्वाचे आहे. अन्नधान्याची तूट असलेल्या भागात शेतसारा माफ करणे,कमाल उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांचा यथोचित गौरव करणे,कृषीपंडित ही पदवी त्यांना देणे, शेतमालाला हमी किंमत देणे,नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध करून देणे अशा प्रकारची व्यवस्था होणे अत्यंत

गरजेचे आहे.

### *5 संदर्भ सूचीः–*

1 डॉ. धनंजय आचार्य मध्ययुगीन भारत(1000 ते 1907 श्री साईनाथ प्रकाशन– नागपूर 2005

2AbdulHalim,History of the lodi sultans ofAgra and Delhi, punchshil publication,jaypur 1990

3 वी.डी. महाजन मध्यकालीन भारत, एस.चंद एण्ड कम्पनी लि,नई दिल्ली 2002

4 A.b. Habibulla, A Compressive History ofIndia Vol V foundation of the Muslim Rule in india 1996

5 आर. के. सक्सेना, दिल्ली सल्तनत (1200 ते 1526 तक) पंचशील प्रकाशन जयपूर1986

6 आर.एस. शर्मा, भारतीय इतिहास एक पुर्नविचार, दिल्ली विश्वविदयालय 2011

7 Stanly Lane Pool , Medieval India under Mohammedan Rule

8 साकी मुस्तईद खॉ, मुआसिर–ए–आलमगीरी–बिबलोयिका इंडिका,कलकत्ता 187073